दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १९९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१४ ऑक्टोबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# राज्यातील महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरु

## दोन्ही डोस घेतलेले विद्यार्थी/विद्यार्थीनी प्रत्यक्ष उपस्थित राहू शकणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दि.२० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे, अशी घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केली.**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.सामंत म्हणाले की, ज्यांनी कोविड–१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत, ते विद्यार्थी/विद्यार्थीनी विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील आणि ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींने कोविड–१९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरिता विद्यापीठाने संबंधित संस्थांचे प्रमुख/महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे मदतीने स्थानिक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे. तसेच विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे देखील लसीकरण प्राधान्याने करुन घ्यावे.

विद्यापीठ / महाविद्यालयांचे वर्ग पूर्णपणे की ५० टक्के क्षमतेने सुरु करावे, याबाबत स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करुन विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.प्रतिबंधित क्षेत्रात येणारी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या अंतर्गत येतात, त्यांच्याशी कोविड–१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित क्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय संबंधित विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर घ्यावा आणि महाविद्यालयांना सविस्तर मार्गदर्शक सूचना/ मानक कार्य प्रणाली (एसओपी) देण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी सांगीतले.

सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांना कोविड–१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निर्देश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निर्देश, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना मानक कार्य



प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील. ज्या विद्यार्थी/विद्या–र्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. वसतीगृहे टप्प्याटप्प्याने सुरु करण्याबाबत संचालक उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षण यांनी आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच मुंबई महानगर क्षेत्रामध्ये वाहतुकीचे मुख्य साधन लोकल ट्रेन असल्याने विद्यार्थ्यांना प्रवासाची परवानगी मिळणे आवश्यक असल्याने याबाबतचा प्रस्ताव मुख्य सचिवांकडे पाठविण्यात येईल. विद्यार्थी आणि पालक यांनी सुद्धा काविड–१९ च्या पार्श्वभूमीवर जाहीर केलल्या नियमांचे पालन करुन लसीकरण करावे, असे आवाहनही मंत्री श्री. सामंत यांनी केले.

# पनवेलचे डायलिसिस सेंटर होणार सुरु ; नागरिकांना होणार लाभ

## विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर करिता तज्ज्ञांची निवड करून सेंटर सुरू करण्याची मागणी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी राज्यमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे केली होती. त्यानुसार लवकरच येथील डायलिसिस सेंटर सुरू होणार आहे. याचा लाभ शेकडो नागरिकांना होणार आहे. जिल्हा रुग्णालय अलिबाग येथील डायलिसिस टेक्नीशियन साक्षी संजय राजीवले यांची प्रतिनियुक्ति रद्द करून पनवेल येथे हजर होणेबाबत कळविण्यात आले असल्याचे जिल्हा रुग्णालय अलिबाग रायगडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यांनी पत्राद्वारे कळविले आहे.





पनवेल शहरातील तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरु करण्यास काही महिन्यापासून लागणारी उपकरणे देखील येथे बसवण्यात आलेली आहेत. परंतु तज्ञांची निवड करण्यात आली नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे. रायगड जिल्ह्यातून येथे उपचार घेण्यासाठी अनेक रुग्ण येत असतात. किडनी आणि मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचार घेणे खर्चिक असल्याने जिल्ह्यातील रुग्ण दगावण्याची संख्यादेखील वाढत आहे. त्यामुळे तातडीने संबंधित विभागास आदेश देऊन नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात तज्ञांची निवड करून सेंटर सुरू करण्यात यावी अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका प्रीती जॉर्ज, डॉक्टर सुरेखा मोहोकर, सारिका भगत यांनी राज्याच्या राज्यमंत्री आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले आहे. त्यानुसार पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथील डायलिसिस यूनिट कार्यान्वित करण्यासाठी जिल्हा रुग्णालय अलिबाग येथील डायलिसिस टेकनीशियन साक्षी संजय राजीवले यांची प्रतिनियुक्ति रद्द करून पनवेल येथे हजर होणेबाबत कलविण्यात आले असल्याचे जिल्हा रुग्णालय अलिबाग रायगडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यानी कळविले आहे.

## संक्षिप्त...

### श्रीवर्धनमध्ये बिबट्याचा वावर? व्हिडीओ व्हायरल

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यातील दांडगूरी परिसरात बिबट्याचा वावर असल्याची एक बिबट्या वाघाची व्हिडिओ सध्या मोठ्याप्रमाणात व्हायरल होत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीदायक वातावरण निर्माण झालं आहे. दांडगूरी येथील ग्रामस्थ पत्रकार श्रीकांत शेलार यांनी बिबट्याचा याठिकाणी नेहमी वावर असून सदरची व्हिडीओ मी स्वतः केली असल्याचा दावा केला आहे. दांडगूरी हे गाव डोंगराळ भागात असून गावाला जोडून मोठं जंगल आहे. गेले अनेक महिने याठिकाणी बिबट्याचा वावर असून मागील काही महिन्यांपूर्वी मी स्वतः बिबट्याचा वावर असल्याचे अस्तित्व जाणवून देणारे शेतातील पायांचे ठसे वन वनविभागाला दाखवले होते. आणि आता बिबट्या माझ्या स्वतः च्या कॅमेऱ्यात कैद झाला असल्याचा दावा श्रीकांत शेलार यांनी केला आहे. याबाबत वन बिभागाचे अधिकारी राऊत यांच्याकडे चौकशी केली असता या व्हिडीओ बाबत कोणतीही खात्रीपूर्वक माहिती आमच्याकडे नसल्याचं प्रस्तुत प्रतिनिधी जवळ बोलताना सांगितलं.

# कर्जतमधील शिवसेना, शेकाप कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेकडे आकर्षित होऊन कर्जत तालुक्यामधील पाषाणे ग्रामपंचायत हद्दीतील शिवसेना आणि शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

खांदा कॉलनीत झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, पनवेल महापालिकेचे नगरसेवक प्रकाश बिनेदार, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कर्जत तालुका युवा मोर्चा अध्यक्ष प्रमोद पाटील, सहकार सेलचे तालुकाध्यक्ष प्रकाश पेमारे, भाजप तालुका उपाध्यक्ष सचिन म्हस्कर, सरचिटणीस राजेश भगत, युवा नेते किरण ठाकरे, राहुल बदे आदी उपस्थित होते.

या वेळी भाजप कर्जत तालुका उपाध्यक्ष सचिन म्हसकर, कळंब विभाग अध्यक्ष संदीप पालांडे व पोशीर पं. स. विभाग अध्यक्ष सुनील शेळके यांच्या प्रयत्नाने पाषाणे ग्रामपंचायत हद्दीतील संभाजी वेहेले, दशरथ वेहेले, निलेश ऐनकर, नरेश धुळे, जगदिश धुळे, किरण नाईक, रोशन पाटील, समीर निचिंधे, सतीश जोशी, गणेश विषे, सतिश दिघे, हेमंत निचिंधे, राम जोशी, सुनील दळवी, अविनाश दळवी, श्याम जोशी, निखिल ऐनकर, केतन ऐनकर, सागर दळवी, नंदू दळवी, राजेश जोशी या शिवसेना व शेकाप कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांनी पक्षात स्वागत केले.



# सिडकोच्या अतिक्रमण विभागासमोर महाविकास आघाडी एकवटली

## ग्रामस्थांनी मानले महाविकास आघाडी नेत्यांचे आभार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई सिडको हद्दीतील कारवाईबाबत महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यापासून सिडकोच्या कारवाईला ब्रेक लागला होता. मात्र भाजपच्या वतीने येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त आणि शेतकऱ्यांच्या गरजेपोटी घरे व दुकानांवर गदा आणण्यासाठी सिडकोला पत्रव्यवहार करून सिडकोवर दबाव आणला जात असल्यामुळे पुन्हा एकदा सिडको प्रशासनाने आपला कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली. आज बुधवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ रोजी कळंबोली परिसरात सदर कारवाई करण्यास सुरुवात केली असता महाविकास आघाडीचे नेते एकवटले आणि सिडकोच्या या कारवाईला धुडकावून लावले.

राज्यात भाजपचे सरकार असताना कळंबोली परिसरात अशीच सिडकोची कारवाई करण्यासाठी पथक आले होते. मात्र त्यावेळी कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत सिडकोला विरोध केला होता,

यावेळी या आमदाराला पोलीस ठाण्यात उचलून नेण्यात आले. मात्र स्थानिक प्रकल्पग्रस्त आणि येथील सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी आपण ठाम उभे असल्याचे पुन्हा एकदा आमदार बाळाराम पाटील यांनी दाखवून दिले.

यावेळी सिडकोच्या तोडक कारवाईला विरोध करण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते आमदार बाळाराम पाटील, शिवसेना नेते बबनदादा पाटील, कॉंग्रेसचे आर सी घरत, सुदाम पाटील, कळंबोलीचे कर्तव्यदक्ष नगरसेवक रवींद्र भगत या नेत्यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, कळंबोली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांच्याशी चर्चा करून तोडक कारवाईस स्थगिती देण्याची विनंती केली.

महाविकास आघाडीच्या नेत्यांचे रौद्ररूप पाहिल्यानंतर सिडकोने त्वरित कारवाईस स्थगिती दिली. सदर तोडक कारवाई थांबविल्याने महाविकास आघाडीचे नेते व पोलीस प्रशासन यांचे कळंबोली ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक हार्दिक आभार मानले गेले. पनवेल येथील शेतकरी कामगार पक्ष कार्यालयामध्ये कळंबोली येथील ग्रामस्थ माया शंकर भगत, कमलाकर जळे, कृष्णा भगत, प्रल्हाद चौधरी, गणेश अनंत भगत, श्रीपाद मुकुंद भगत, प्रवीण भगत, सचिन भगत, कुणाल भगत आदींनी महाविकास आघाडीच्या नेत्यांचे आभार मानले.

### गावांचा विकास साध्य करण्यासाठी...

# सरपंच, पदाधिकारी यांची मानसिकता गावाच्या विकासाच्या दृष्टीने सकारात्मक : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

म्हसळा तालुक्यातील गावांचा विकास साध्य करून घेण्यासाठी त्या त्या गावातील सरपंच, पदाधिकारी यांची मानसिकता गावाच्या विकासाच्या दृष्टीने सकारात्मक होत आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी खारगाव बुद्रुक येथे सामाजिक सभागृहाचे उद्घाटन करताना केले.



पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी खारगाव बुद्रुक येथील सामाजिक मंडळासाठी ५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. उपलब्ध निधीतून उभारण्यात आलेल्या सभागृहाचे बांधकाम ग्रामस्थांनी चांगल्या दर्जाचे केल्याबद्दल पालकमंत्री कु. तटकरे यांनी सर्वांचे कौतुक करून समाधान होत असल्याची भावना व्यक्त केली. खारगाव बुद्रुक गावातील पाणीपुरवठा करणे, या कामासाठी ३६ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून भविष्यात गावात पाणी टंचाई निर्माण होणार नाही, असे सांगितले.

यावेळी अलिशेठ कौचाली, समीर बनकर, तहसिलदार समीर घारे, गट विकास अधिकारी वाय.एम.प्रभे, सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदीप चाचले, माजी सभापती उज्वला सावंत, सरपंच अनंत नाक्ती, अंकुश खडस, मनोज नाक्ती, दामोदर पांडव, रेश्मा काणसे, नाना सावंत, अनिल बसवत, सतीश शिगवण, प्रकाश गाणेकर, लहू म्हात्रे, चंद्रकांत कापरे आदी मान्यवर उपस्थित होते.

म्हसळा तालुक्यातील गाव,वाडी, वस्तीतील लोकोपयोगी विकासकामांसाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे तसेच खासदार सुनिल तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांच्या विकासनिधीतून सुमारे ३ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून होणाऱ्या विकासकामांचे उद्घाटन व भूमीपूजन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते आज संपन्न झाले.

म्हसळा तालुका नियोजित दौऱ्यात म्ह–सळा तालुक्यातील खारगाव बुद्रुक येथे सामाजिक सभागृहाचे उद्घाटन, म्हसळा शहरातील कन्याशाळेजवळील श्री राम अंगणवाडी इमारत बांधकाम भूमीपूजन, बनोटी–कातळआळी येथील सभा मंडपाचे भूमीपूजन, खरसई नवीन वसाहतीमधील वीज पोलचे

.../२

# केवायसी अपडेटच्या माध्यमातून साडेतीन लाखाची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या काही दिवसांपासून केवायसी अपडेटच्या नावाखाली फसवणूक होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशीच घटना घडली आहे. सायबर ठगाने केवायसी अपडेटच्या नावाखाली ऑनलाईन टीम व्हिवर क्विक सपोर्ट आणि ॲनीडेस्क रिमोट डेस्कटॉप सॉफ्टवेअर अशी दोन अँप मोबाईल मध्ये डाउन लोड करण्यास सांगून त्यामाध्यमातून ३,३१,७४३/–रक्कमेची केली फसवणुक करीत बँक खात्यावर डल्ला मारला आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फसवणुकीसाठी सायबर चोरटे नवनवीन क्लुप्त्या लढवत असतात. सध्या मोबाईल केवायसी अपडेटच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे समोर येत आहे. अशीच घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये घडली आहे. पनवेल तालुक्यातील चिपळे गाव येथे राहणाऱ्या

.../२




# निवृत्तिवेतन मिळत नसल्याने अनु. जमातीच्या लोकांवर उपासमारीची वेळ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

आपल्याच हक्काचे पैसे सुध्दा वेळेत मिळत नसल्याने अनुसूचित जमातीच्या बाबतीत अत्यंत कठोरपणे वागणाऱ्या निर्दयी शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी या लोकांना गांधीगिरी करून उपोषणाचे एकमेव शेवटचे हत्यार वापरून देखील घाम फुटत नाही एखादया दगडाला सुध्दा एकवेळ पाझर फुटला असता परंतु अनेक वर्षांपासून अनुसूचित जमातीच्या लोकांना दुय्यम वागणूक दिली जात आहे त्यामुळे शासकीय सेवेत इमानेइतबारे सेवा करून सुध्दा शेवटच्या क्षणी पदरात पडणारे निवृत्तिवेतन मिळत नसल्यामुळे अनेकांना आता उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. अन्य समाजाच्या बाबतीत शासनाने आजवर कुठल्याही प्रकारचा दुजभ केलेला नसून फक्त अनुसूचित जमातीच्या लोकांवर ही दडपशाही का केली जात आहे हाच एकमेव यक्षप्रश्न या लोकांना वारंवार सतावत आहे. दि.२ ऑक्टोबर गांधी जयंतीच्या मुहूर्तावर केवळ आपल्या कष्टाचे पैसे आपल्या कुटुंबाला आधार म्हणून मिळावेत जेणेकरून उर्वरित आयुष्य मुलाबाळांच्या सोबत सुखसमाधान व्यथित करता येईल



हे स्वप्न उराशी बाळगून सुध्दा या अंतिम स्वप्नांची राखरांगोळी करण्यात शासनाला धन्यता वाटत आहे ही बाब खरोखरच लांच्छनास्पद असल्याचे उपोषणाला बसलेले जेष्ठ वयोवृद्ध लोक करीत असून दि.१३ रोजी या उपोषणाला १२ दिवस पूर्ण होत आहेत. याचप्रकारे स्वतःवर बेतलेल्या प्रसंगाबाबतीत एका मयत पत्नीने आपली कैफियत मांडली आहे त्यामुळे हृदयाला वेदना झाल्याशिवाय राहणार नाहीत.

माझे पती स्व. मोहन टिक्कस हे केळकर कॉलेज मुलुंड(पुर्व)मुंबई येथे लॅब असिस्टंट पदावर कार्यरत होते. त्यांचे दि.८/१०/२०२० ला निधन झाले. आता वर्ष झालं तरीही मला अनुकंपाखाली नोकरी मिळाली नाही. माझ्या कुटुंबाचा आधार गेल्यानंतर मला खऱ्या अर्थाने नोकरीची गरज आहे.पण वयाचं कारण सांगून मला नकार दिला...दोन मुलं आहेत शिक्षणाची. मुलगी हुशार आहे.पुण्याच्या नामवंत कॉलेजला नंबर लागला पण ऍडमिशन घ्यायला पैसे नाहीत. ना ही मला कुठला लाभ मिळाला ना पेन्शन. माझ्या संसारावर आभाळंच कोसळलं आहे.

श्रीमती अलका टिक्कस यांना आपली व्यथा सांगत असताना अक्षरशः गहिवरून आलं.शासनाने अद्यापही निर्णय न घेतल्यामुळे आता मी करावे तरी काय?असा दु:खद सवाल त्यांच्या पत्नी अल्का मोहन टिक्कस यांनी उपस्थित केला. त्या आज आफ्रोह संघटनेच्या वतीने आझाद मैदान येथे सुरू असलेल्या साखळी उपोषणाला आज बसल्या होत्या.

# छ. शिवाजी महाराजांचा पुतळा प्रभाकर पाटील यांनी लावला : पंडितशेठ पाटील

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील शे. का. प. च्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन माजी आमदार पंडितशेठ पाटील यांच्या हस्ते आज संपन्न झाले. १९८४ साली शे. का. पक्षाची गाडीसुद्धा म्हसळ्यात लावता येत नव्हती अशी शे. का. प. अवस्था असताना दि. बा. पाटील, दत्ता पाटील, प्रभाकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शे. का. प. ची घोडदौड जिल्हात सुरु झाली.

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघात आम्ही शून्यातून पक्षाचे अस्तित्व निर्माण केले. बॅ. अंतूले साहेबांच्या मागे संपूर्ण मुस्लिम समाज ठाम पाठीशी उभा असल्याने संपूर्ण मतदार संघात काँग्रेस भक्कम होती. त्याही परिस्थितीत मतदार संघातील आमच्या सहकाऱ्यांच्या सहकार्यातून शे. का. प. ने अनेक विकासकामे केली. आंबेत येथे छ. शिवाजी महाराज यांचा पुतळा सर्वप्रथम प्रभाकर पाटील यांनी उभारला याची आठवण प्रत्येक नागरिकाला होणे अत्यावश्यक असल्याचे पंडित शेठ पाटील यांनी सांगितले. पक्षाला पंचायत समिती, जिल्हा परिषदेत आपला प्रतिनिधी निवडून देता आला.

मध्यंतरीच्या काळात मतदारसंघाची फेररचना झाल्याने थोडस दुर्लक्ष झालं हे जरी सत्य असलं तरी गेली तीनचार वर्षांपासून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी पक्षाचे कार्यालय असावे अशी कार्यकर्त्यांजवळ माझी मागणी होती असे सांगून पंडितशेत पाटील यांनी सांगितले की पक्ष कार्यालयच्या माध्यमातून तालुक्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्याशी जवळून संपर्क साधता येतो.

# तळा दगडी शाळेचा १०१ पट घेऊन दोन शिक्षक हाकीत आहेत गाडा

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक मराठी मुलांची शाळा (दगडी शाळा) केंद्रीय शाळा आहे माजी केंद्रीय अर्थमंत्री कै. सि.डी.देशमुख माजी विद्यार्थी होते. त्यामुळे या शाळेने असे अनेक विद्यार्थी घडवले असून देशसेवा केली आहे. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा अतिशय उत्तम असल्याने पालकांचा सद्यस्थितीत दृष्टिकोन याकडे बघण्याचा बदलला असल्याने पालक पाल्यांना याच शाळेत प्रवेश घेत आहेत. मध्यंतरीच्या काळात परिस्थिती अतिशय बिकट झाली होती.

शाळा बंद पडायच्या मार्गावर असतानाच मराठी शाळा टिकल्या पाहिजेत या उदात्त हेतूने स्थानिक कमिटी माजी विद्यार्थी संघटनेने, तत्कालीन शिक्षकांच्या प्रयत्नाने पट वाढविला आणि आता तर चांगलीच पटसंख्या वाढली आहे. शैक्षणिक वर्ष सन १६/१७–२२, १७/१८–४४, १८/१९–५४,१९/२०–८०, २०/२१–८७,२१/२२–१०१ अशी विद्यार्थी पट संख्येचा वाढता आलेख आहे. त्या बरोबर शिक्षक संख्या मात्र वाढली गेली नाही. सन १६ ते १९ साली ३ शिक्षक कार्यरत होते. सन १९ पासून पट संख्या वाढत असूनही आज पर्यंत २ कायम शिक्षक २ तात्पुरतेच दिले आहेत. त्यामुळे दोन शिक्षक १०१ विद्यार्थी पटसंख्या घेऊन ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत याबाबत अनेक वेळा पालकांनी शिक्षण विभागाकडे कैफीयत मांडली लेखी मागणी तालूका प्रशासन जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे केली गेली आहे.

तसेच वृतपत्राच्या माध्यमातून अनेक वेळा शिक्षण विभागाचे लक्ष वेघण्याचा प्रयत्न केला गेला तरी देखील अजूनही प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे .तालुक्यातील काही शाळाची परिस्थिती बिकट असूनही दोन ते तीन शिक्षक आहेत मग केंद्रीय शाळेकडे दुर्लक्ष का? असा सवाल स्थानिक नागरिक व पालकांकडून केला जात आहे. प्राथमिक शाळेतील उच्च पदवीधर मेहनती शिक्षक, शिक्षण विभागाकडून नियोजनबध्द शैक्षणीक दर्जा वाढत असल्याने या शाळेतील विद्यार्थी सी बी ई एस च्या जनोदय विद्यालय विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले असून निवड झाली आहे. हे या शाळेचे वैशिष्ट्य ठरले असूनही शिक्षण विभाग जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहेत असे बोलले जात आहे. याचा परिणाम पट घटी वर होत आहे. तरी जिल्हा परिषद शिक्षण विभाग सभापती, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड यांनी त्वरीत लक्ष घालावे अशी विनंती पालक माजी विद्यार्थी संघटना, स्थानिकांकडून केली जात आहे.

---

मा.श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारांचे वकील : ॲड.हृदयनाथ म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१३८२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/१२/२०२१

१) श्रीमती.नम्रता नितीन घरत
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.अशोकबाग, झोपडपट्टी, वडाळा तलाव, सावरकर चौक,
लोखंडीपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.प्रियंका पंढरीनाथ पाटील
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्र.९७, विठोबा मंदिरा जवळ,
मु.दुंदरे, पो.मोरबे, ता.पनवेल, जि.रायगड
३) कु.निकिता नितीन घरत
वय : २६ वर्षे, धंदा : शिक्षण
४) कु.रितू नितीन घरत
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
क्र.३ व ४ दोघेही रा.अशोकबाग झोपडपट्टी, वडाळा तलाव,
सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.नितीन रामचंद्र घरत हे दि.२६/१२/२०१९ रोजी बेलापूर येथे मयत झाले आहेत. वरील अर्जदार यांनी कै.नितीन रामचंद्र घरत यांच्या खालील मिळकतीसंबंधी वारसदाखला मिळण्यासाठी या मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**निवासी मालमत्ता क्रमांक** V12Z2005738/T/2 **अशोकबाग झोपडपट्टी, वडाळा तलाव, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**

तरी सदरचे अर्जदार हे कै.नितीन रामचंद्र घरत यांचे कायदेशीर वारस आहेत. या त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपली हरकत दाखल करावी.

वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदरकामी वारसाचा दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

वकील : श्री.आनंदा पोळ

## जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे न्यायालयात

चौ.अर्ज नं.१२९४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२४/११/२०२१

श्री.मनोज लक्ष्मण वाडकर
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : धंदा
पत्ता : १४४, महाकाली शिवशंकर नगर,
नवा आगरीपाडा, अहमदाबाइ रोड, वकोला
पोलीस ठाणे जवळ, सांताक्रुज (ईस्ट) मुंबई–४०००५५ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदार यांचे सासरे कै.आनंदा विठ्ठल धनावडे यांचे दि.०३/०७/२०२० रोजी बोरगाव बुद्रुक, तालुका : वाई, जिल्हा : सातारा येथे निधन झाले. मयत कै.आनंदा विठ्ठल धनावडे यांचे नावे असलेली मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**सदनिका क्रमांक ए–५०४, पाचवा मजला, गुरूवाटीका को.ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, भूखंड क्रमांक डी–१, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई–४१०२१०, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

**बिल्टअप एरिया ८२.४२ चौ.मी. नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने प्रोबेट दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील प्रोबेट दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे प्रोबेटचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/१०/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.योगेंद्र दुबे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४१२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/१२/२०२१

श्रीम.लता नामदेव शिंदे व अन्य
वय : ५२ वर्षे, व्यवसाय :
रा.मनोहर नगर, डी–५, साकी विहार रोड,
केविएम शाळजवळ, पवई, साकीनाका, मुंबई ४०००७२ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कै. नामदेव दामू शिंदे यांचे प्रत्यक्ष मालकीची व ताबेकब्जावहिवाटीतील मिळकत होती व आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**गाळा क्र.१३, क्षेत्र २६.९५ चौ.मी.,**
**साई सागर, प्लॉट ५०, सेक्टर २०, खारघर,**
**नवी मुंबई ४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.नामदेव दामू शिंदे यांचे दि.१६/०८/२००९ रोजी मुंबई येथे निधन झाले आहे. कै.नामदेव दामू शिंदे यांची वर नमूद मिळकतींचे वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने/नी आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.१३/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

अर्जदार तर्फे वकील : अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात

मो.अप.क्लेम नं.३८/२०२०
नि.नं.१४/ड
ने.ता.२२/१०/२०२१

यशोदा भाऊ मोरे अर्जदार

विरुद्ध

१) अहिल्या टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स
२) रॉयल सुंदरम इन्श्युरन्स कं.लि. सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं.१) अहिल्या टुर्स ॲण्ड ट्रव्हल्स
रा.रुम नं.०४, अे–टाईप, चाळ नं.४२,
सेक्टर १३, न्यू पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६

दिनांक २०/०१/२०२० रोजी सकाळी ०८.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे : कामोठे येथील वेंकट हॉटेलच्या समोर, पुणे–मुंबईकडे जाणारे रोडवर, कामोठे पोलीस ठाणे, ता.नवी मुंबई, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ यांचे वडील भाऊ मारुती मोरे हे मयत झालेले आहेत.

सदर अपघातामध्ये वॅगनार कार क्र.एम.एच.४६/ए डी ३५८५ वरील चालक हा भाऊ मारुती मोरे यांच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.९,००,०००/– ची नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे. मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२२/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**जिल्हा न्या.रायगड–अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**जिल्हा न्या.रायगड–अलिबाग**

---

अर्जदार तर्फे वकील : अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात

मो.अप.क्लेम नं.४१/२०२०
नि.नं.१९/ड
ने.ता.२९/१०/२०२१

कृष्णा सावळाराम गायकवाड अर्जदार
वगैरे १

विरुद्ध

१) अेएसएल लॉजिस्टीक प्रा.लि.
२) बजाज अलियान्झ जनरल इन्श्युरन्स कं.लि. सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं. अेएसएल लॉजिस्टीक प्रा.लि.
पत्ता : ४०१, सेक्टर ७, प्लॉट नं.२,
साईप्रसाद आर्केड, कामोठे, ता.पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०९

दिनांक १७/०१/२०२० रोजी दुपारी १२.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे : पळस्पे गावचे हद्दीत, पळस्पे गावा समोरील ब्रिजच्या खाली, पळस्पे फाटा ते अलिबाग जाणाऱ्या रोडवर, पळस्पे ग्रामपंचायत कार्यालयाजवळ रोडवर असणारे श्री.शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ, पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ यांची मुलगी, अर्जदार नं.२ यांची बहिण काजल कृष्णा गायकवाड ही मयत झाली आहे.

सदर अपघातामध्ये टेम्पो क्र.एम.एच.४६/एफ २९४८ वरील चालक दिनेश रोहिदास बादलू हा काजल कृष्णा गायकवाड हिच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.१७,००,०००/– ची नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२९/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**जिल्हा न्या.रायगड–अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**जिल्हा न्या.रायगड–अलिबाग**

---

राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.प्रमिला ए. पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१३४५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२४/११/२०२१

श्री.दिपक कृष्णा साळुंखे
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
रा.घर नं.९२३, ओवे कॅम्प, टाटा हॉस्पिटल रोड,
सेक्टर ३२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. कृष्णा धोंडू साळुंखे हे मौजे : रा. घर नं.९२३, ओवे कॅम्प, टाटा हॉस्पिटल रोड, सेक्टर ३२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवाशी होते व ते दि.२७/०६/२०१७ रोजी मौजे : घर नं.९२३, ओवे कॅम्प, टाटा हॉस्पिटल रोड, सेक्टर ३२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मरण पावले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.कृष्णा धोंडू साळुंखे त्यांचे मालकीची खालील वर्णन केलेल्या घर मिळकती संदर्भात वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

**घर मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारघर–ओवे, ता.पनवेल, जि.रायगड**

**१) मौजे : खारघर–ओवे, पनवेल शहर महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड. घर क्र.४१७ ब, क्षेत्र १४८५ चौ.मी. घर मिळकत**

**२) मौजे : खारघर–ओवे, पनवेल शहर महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड, घर क्र.९२३, क्षेत्र १४८५ चौ.मी. घर मिळकत**

वरील अर्जदार हे मयत कै.कृष्णा धोंडू साळुंखे यांचे वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या मे.कोर्टात १ महिन्याच्या आत स्वतः हजर राहून अगर त्यांचे वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.कृष्णा धोंडू साळुंखे यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यांस वरील घर मिळकतीचे संदर्भात वारस दाखला देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दि.०८/१०/२०२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलाने प्रस्ताविक जमीन मालक गौतम वसंतलाल मुनोत या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बोरघर हवेली, ता.तळा, जि.रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. लागवडी योग्य पोटखराबा | आकार रु.पै. | जमीन प्रकार |
|---|---|---|---|---|
| १६० | | ०–८१–०<br>०–२०–०<br>१–०१–० | ०.४८ | गवत |

**मिळकतीचे वर्णन आजच्या प्रमाणे**
**मौजे : साई धाम, ता.तळा, जि.रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. लागवडी योग्य पोटखराबा | आकार रु.पै. | जमीन प्रकार |
|---|---|---|---|---|
| १०७ | | ०–८१–०<br>०–२०–०<br>१–०१–० | ०.४८ | गवत |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये अगर मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणाही व्यक्ती, संस्था, कंपनी, वालीवारस यापैकी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, समझोता करार, गहाण, दान, बक्षिस बोजा, चार्ज, ॲटॅचमेंट, लिज, वहिवाट, वारसाहक्क, दावा, वादविवाद व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास सदर व्यक्ती, संस्था, कंपनी वा त्यांचे हितसंबंधी यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपली हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यानिशी सिद्ध करता येईल अशी कागदपत्रे घेवून खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्कसंबंध, हितसंबंध नाही असे गृहीत धरण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत. त्या विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१३/१०/२०२१

**सही/–**
**ॲड.अर्चना आत्माराम म्हसकर**
**कार्यालयीन पत्ता : शिव कृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.२५, सेक्टर १२, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९**
**मो.नं.९९२०७७९७९**

---

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सरपंच, पदाधिकारी यांची मानसिकता गावाच्या विकासाच्या दृष्टीने सकारात्मक

उद्घाटन, खरसई येथे नवीन साकव बांधकामाचे उद्घाटन, खरसई जय हनुमान मित्र मंडळाच्या सभामंडप कामाचे भूमीपूजन, काळसुरी–महिला सामाजिक सभागृहाचे उद्घाटन, असे विविध कार्यक्रम पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

## केवायसी अपडेटच्या माध्यमातून साडेतीन लाखाची फसवणूक

एका ६५ वर्षीय नेव्ही मधुन सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीची फसवणूक झालेली आहे. हा व्यक्ती दोन फोन वापरत आहे. यातील एम.टी.एन.एल.डल्फीन कंपनीच्या सिमकार्डवर तुमचा हा सिमकार्ड स्थगीत होणार असल्यामुळे व के.वाय.सी.अपडेट करण्यासाठी २४ तासाच्या आत संपर्क करण्यासाठी संदेश आला. यावेळी मॅसेज आलेल्या नंबर फोन केला असता समोरच्या व्यक्तीने फोन उचलला नाही. यावेळी तक्ररदाराने आपल्या दुसऱ्या नंबरवरून फोन केला असता समोरून हिंदीमध्ये एक व्यक्ती बोलत होता. यावेळी सिमकार्ड व्हेरिफिकेशन करण्यासाठी केवायसी अपडेट करावे लागेल यासाठी टीम व्हिवर क्विक सपोर्ट आणि ॲनीडेस्क रिमोट डेस्कटॉप सॉफ्टवेअर अशी दोन अँप मोबाईलमध्ये डाउनलोड कारण्यास सांगून सुरुवातील १० रुपये पाठविण्यास सांगितले. पाठविलेल्या १० रुपयांचा रिचार्ज फेल गेला. त्यामुळे त्या भामट्याने इंटरनेट बँकिंग मधून १० रुपये पाठवण्यास सांगितले. व तक्रारदाराने पाठविले. मात्र दहा रुपये पोहोच होताच. त्या भामट्याने दोन बँकेतून असे एकूण ३,३१,७४३/–रक्कमेवर डल्ला मारला. त्यानंतर पुन्हा तक्रादाराने फोन केला असता त्या भामट्याने आपले नाव राहुल शर्मा असल्याचे सांगितले व फोन कट केला, आणि पुन्हा फोन लागलाच नाही. यावेळी तक्रारदाराला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे गाठत फसवणुकीबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## संत गोरा कुंभार समाज नवरात्रोत्सव मंडळाचा नवरात्रोत्सव साधेपणाने संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**


कोरोनाच्या हाणामारीत मार्च २०२० पासून सर्वधर्मीयांचे सण आणि उत्सव अत्यंत साधेपणाने साजरे करावे लागले. कोरोनाने सर्वांच्याच उत्साहावर नैराश्याचे सावट पसरविले. गेल्या ३० वर्षांपासून म्हसळा शहरात श्री राम सार्वजनिक नवरास्त्रोत्सव मंडळ आणि श्री संत गोरा कुंभार समाज नवरात्रोत्सव मंडळ कार्यरत असून या मंडळांच्या माध्यमातून वर्षभरात विविध विधायक उपक्रम साजरे करतात.

संत गोरा कुंभार समाज नवरात्रोत्सव मंडळाचे गेली अनेक वर्षे समर्थपणे आणि प्रामाणिक पणे धुरा सांभाळणारे विद्यमान अध्यक्ष सुनिल अंजर्लेकर हे समाजासाठी शासनाच्या विविध योजना राबवून त्याचा समाजासाठी जास्तीत जास्त कसा फायदा होईल या प्रयत्नात असतात. मंडळाचे सर्व पदाधिकारी तसेच समाजातीलच नव्हे तर बहुजन समाजातील वरिष्ठ आणि वडीलधारयांच्या मार्गदर्शनाने मंडळाला प्रगतीकडे नेऊन ठेवले आहे. कोरोनाच्या महामारीमुळे जरी दांडिया खेळता येत नसले तरी पूर्वीच्याच उत्साहात आणि त्याच जोमात आणि कोरोनाच्या सर्व नियम आणि अटींचे पालन करून गरभोत्सवात उत्साह राखण्याचा प्रयत्न सुनिल अंजर्लेकर हे समाजबांधवांच्या माध्यमातून आणि सहकार्यातून सातत्याने करीत आहेत. तरुणांमधील नाराजी आणि निरुत्साह घालविण्याचा प्रयत्न करून सामाजिक सेवेत तरुणांना सामील करून घेऊन त्यांचा उत्साह कायम टिकविण्याच्या प्रयत्नांमुळे ते तरुणांचा आधार झाले आहेत. मंडळातील दिनेश म्हशिलकार, नंदू गोविलकार, संतोष कुडेकर, सुजित बोरकर, भाई बोरकर, सतिश म्हशिलकर, गणेश बिरवाडकर, अभय कलमकर, सुरेश कुडेकर, सुशिल म्हशीलकर महिला मंडळ अध्यक्षा वासंती म्हशिलकर, शालिनी गोविलकर, राधा म्हशीलकर संपूर्ण समाज, हितचिंतक यांच्या सहकार्यामुळे मला काम करणं सोपं झाल्याचे सुनिल अंजर्लेकर यांनी सांगितले.

# भक्तांच्या नवसाला पावणारी वरसगाव येथील तुळजाभवानी माता

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुबंई गोवा महामार्गावरील निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या आदिशक्ती श्री तुळजाभवानी शिवराया देवस्थान कोलाड पासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या वरसगाव या ठिकाणी असणारी भक्तांच्या नवसाला पावणारी भवानी माता असुन वर्षानुवर्षे पारंपारिक पद्धतीने चालत आलेला नवरारत्रोत्सव अत्यंत साधेपणाने साजरा केला जात असल्याचे देवस्थानच्या संस्थापक संचालीका कोकणातील ज्येष्ठ कवयित्री तथा साहित्यिक चंदाराणी कोंडाळकर यांनी सांगितले.



सदर सुरू असलेला देवीचा नावरात्रो उत्सव कोणताही कार्यक्रम नाही की माहेरवाशिंना पाच-ारण सुद्धा केले नाही. अत्यंत साधेपणाने साजरा होत असलेला हा नवरात्रोत्सव शासनाने घालून दिलेल्या नियमांप्रमाणे साधेपणाने, तसेच सुरक्षित अंतर ठेवून, हातपाय स्वच्छ धुऊन, मास्क लावून भक्त भवानी मातेचे दर्शन घेत आहेत. तुळजाभवानी शिवराय देवस्थानाला भेट दिली असता असे समजले की निसर्गाच्या सौंदर्यात बालपणापासूनच तुळजाभवानी शिवरायांच्या भक्त कवयत्री चंदाराणी दिवाडकर- कोंडाळकर यांनी बांधलेला भव्य माय भवानी शिवराया देवस्थान आहे. घटस्थापना होण्याअगोदर एक महिना कार्यक्रमाची रूपरेखा आखून अगदी सुरळीतपणे कोणत्या ही प्रकारचा गोंधळ गडबड याचा लव-लेश नसणारा या नवरात्राचे नऊ दिवस मोठा आनंदमय, भक्तिमय, प्रेमळमय वातावरणामध्ये हा उत्सव साजरा होत असतांना दिसत आहे.


विशेष म्हणजे स्त्रियांना आपल्या सासरी सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत काम करावे लागतात. मात्र नवरात्रोत्सवात रायगड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातून माहेरवाशिणी आपल्या प्रेमळ म्हणून सर्वांचीच (चंदाआई) मातेकडे म्हणजे चंदाराणी ताईंकडे येऊन मनमुराद माहेरचा आनंद लुटतात. ज्यांना आपल्या घरी आई-वडील असलेल्या आणि आई-वडील नसलेल्या माहेरवाशीणी येऊन माहेरचा आनंद लुटतात. त्यांना राहण्याची व जेवणाची सोय चंदाराणी मोफत करून त्यांना आईची माया देतात. शेवटच्या दिवशी आपल्या सासरी जाताना चंदाराणी ताईंच्या कुशीतून हुंदके देत पुढल्या वर्षी दोन दिवस अगोदरच माहेरी येण्याचे सांगून निरोप घेतात.

दर वर्षी नवरात्रोत्सवाला महालक्ष्मीचे पूजन, महाष्टमी प्रसाद,महानवमीला नवचंडी, होम-हवन व नवरात्रो स्थापना, दसरा पूजन, तसेच माहेरवाशिंना सन्मानपूर्वक आदर अशी विविधतेने नटलेल्या कार्यक्रमाची रेलचेल सुरु असते. या ठिकाणाला यापूर्वी सिनेनटी अलका कुबल,शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, मधु मंगेश कर्णिक व विविध स्तरांवरील कार्यरत असलेले भक्तगण आशा अनेकांनी भेट देऊन समाधान व्यक्त केले. देवस्थानचा सभोवतालचा परिसर एवढा मोठा असून सुद्धा त्यावर नीटनेटकेपणा ची सुंदर शाल चढवण्याचे काम व पांघरून आमच्या चंदाराणी ताई आणि काकांनी केले आहे. म्हणून तर नुसत्या नवरात्रोत्सवात जनतेचे आणि भाविकांच्या अलोट गर्दी असते असे नाही तर वर्षाच्या बाराही महिने येथील देवस्थान भाविकांनी फुललेले असते . चंदाताईंचे वय ऐंशी पंच्याऐशी असले तरी त्यांचे शरीर थकलेले दिसत नाही. चंदाताईंचे चिंतन,त्यांची साधन संशोधन हे सारे व्याप सांभाळून चालूच असते. त्यामुळे त्यांनी आठवणीच्या हिंदोळ्यावर चंदाराणी हे २२४ पानांचे पुस्तक लिहून त्या ३६ विविध कथांद्वारे आपल्या अनुभवांचा खजिना सादर करत चंदाराणी कोंडाळकर यांनी स्वतः लिहिलेली गीतांची ध्वनीफीत या पूर्वी प्रसिध्द झालेली असून आत्मचरित्र देखील संपादित व प्रकाशित केले आहे.

# हजारो किलोमीटरचा प्रवास करून सीगल पक्षांचे मुरुड समुद्रकिनारी आगमन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

शेकडो नव्हे तर हजारो किलोमीटरचा प्रवास करून पांढरा शुभ्र रंग, पंखांवर करडा रंग, लालसर काळी चोच व काळेभोर डोळे असे मनमोहक रूप असलेल्या सीगल पक्षांच्या थव्यांचे मुरुड समुद्र किनारी नुकतेच आगमन झाले आहे, साधारण सप्टेंबर ते ऑक्टोबर महिन्यात या पक्षांचे परदेशातुन साधारण दोन हजार किलोमीटर प्रवास करून येथे आगमन होते ते साध-ारण उन्हाळ्याची चाहूल लागेपर्यंत त्यांचा समुद्रकिनारी मनसोक्त विहार असतो नंतर ते परत आपल्या मायदेशी परततात, येथील



समुद्रकिनारी त्यांचे आवडते खाद्य छोटे मासे व खेकडे मुबलक प्रमाणात मिळत असल्याने परदेशी पाहुणे असलेल्या सीगल पक्षांचे थवे च्या थवे येथे दाखल होतात, या पांढऱ्या शुभ्र गोंडस पक्षाला आपल्या कॅमेऱ्यात टिपण्यासाठी पक्षी प्रेमी , निसर्ग छायाचित्रकार व पर्यटक या पक्षांची आतुरतेने वाट पाहत असतात , अथांग पसरलेला मुरुड समुद्र किनारा, निळेशार पाणी व सोनेरी वाळूवर या पक्षांचे थवे हे मनमोहक दृश्य पर्यटकांना आकर्षित करतात परंतु काही अतिहौशी पक्षीप्रेमी पर्यटक या पक्षांना शेव, गाठी ,वेफर्स सारखे पदार्थ खाण्यासाठी उडवितात , या खाद्याची त्यांना अजिबात गरज नसते परंतु अश्या प्रकारचे खाद्य खाऊन त्या पक्षांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते या बाबत जनजागृती करण्याची विशेष गरज असल्याचे पक्षीतज्ञांचे मत आहे .

# कर्ज मिळवून देतो असे सांगून केली ९८ हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उद्योग कर्ज मंजूर करण्याचे आमिष दाखवून कर्ज न देता ९८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार नवीन पनवेल येथे उघडकीस आला आहे. अज्ञात आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवीन पनवेल, सेक्टर १९ येथील प्रेरणा वसंत रणखांबे यांचा हॉटेल व्यवसायिकांना बॅग, कंटेनर पुरवठा करण्याचा व्यवसाय आहे. यावेळी सौरभ भोनकर यांनी त्यांना फायनान्स कंपनीतून कर्ज मिळवून देतो असे सांगितले. आणि स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेतून ६० लाख रुपयांचे कर्ज मंजूर करून देतो असे सांगून त्यांच्याकडून १० हजार रुपये घेतले. त्यानंतर सौरव याने कर्ज मंजूर करण्याचे काम हा त्याचा मित्र प्रेमशील साळवी करून देईल असे सांगितले. त्यानंतर प्रेमशील साळवी याने कर्ज मंजूर करण्याकरता ८८ हजार रुपये रणखांबे यांच्याकडून घेतले. मात्र कर्ज मंजूर केले नाही. कर्ज मिळवून देण्याच्या बहाण्याने रणखांबे यांच्याकडून दोघांनी ९८ हजार रुपये घेऊन त्यांना कर्ज दिले नाही. व त्यांची फसवणूक केली. या प्रकरणी सौरभ भोनकर व प्रेमशील साळवी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पुगाव शिव मंदीर व ग्रामस्थांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

श्री.कमलेश्वर शिवमंदिर व पुगाव ग्रामस्थांच्या वतीने ग्राम पंचायत पुगाव शनिवार दि .०९/१०/२०२१ रोजी सांयकाळी ठीक ४.०० वाजता शैक्षणिक वर्ष २०२०/२१ मध्ये आपल्या गावातील इयत्ता १०वी आणि १२वी मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.



पुगाव ग्रामस्थांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक कळागुणांना वाव मिळावा म्हणून अनेक वर्षांपासून गुणगौरव सोहळा मोठया कार्यक्रमात आयोजित करण्यात येतो परंतु कोरोना विषाणूमुळे दोन वर्षापासून धार्मिक उत्सव या कार्यक्रवर बंदी घालण्यात आली असली तरी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा न थांबता तो मोजक्याच ग्रामस्थांच्या उपस्थितीत सुरु आहे ही कौतुकास्पद उपक्रम सुरु आहे. या कार्यक्रमात इयत्ता १० मधील १७ व बारावी मधील १५ उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सौ.नेहा म्हसकर सरपंच पुगाव, श्री नारायणराव धनवी, बबन म्हसकर, सुधीर शेळके, सौ आदिती झोलगे, सौ.अनिता खामकर, सौ. निशिगंधा कळमकर, सौ पल्लवी धनवी-सरोदे शासकीय आधिकारी, विट्ठल येळकर निवृत्त शिक्षक, सुभाष देशमुख, राजेंद्र धनवी सिप्ला कंपनी डायरेक्टर, काशीराम देशमुख, राजेंद्र निळेकर, चंद्रकांत आधिकारी प्राध्यापक,ग्रामस्थ व पालक वर्ग हे उपस्थित होते.

---

मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

ॲड.प्रदीप भोईर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

क्रि.चौ.अर्ज क्र.१०५१/२०२१
नि.नं.७/ड

श्री.जाहिद हुसैनमियाँ सुभेदार
वय : ३८ वर्षे, धंदा : व्यापार
रा.तळोजा, पाण्याच्या टाकीजवळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.निबंधक,
मे.पनवेल महानगरपालिका
विभाग-तळोजा पाचनंद,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील मयत हुसैनमियाँ अब्दुल कादीर सुभेदार हे दि.२०/११/२०१९ रोजी मौजे : तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तथापि अनावधानाने मयत हुसैनमियाँ अब्दुल कादीर सुभेदार यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत पनवेल महानगरपालिका कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत हुसैनमियाँ अब्दुल कादीर सुभेदार यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हे सर्व कळावे.

ही नोटीस आज रोजी दि.१३/१०/२०२१ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

---

मा.श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.संजय के. कानडे
ॲड.अनिल आर. नागदेवे
ॲड.गौरव संजय कानडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१३५४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२१

१) श्री.संतोष काशिनाथ पास्ते
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.योगेश काशिनाथ पास्ते
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
क्र.१ व २ रा.सिडको कॉलनी, बी-१०/६, रुम नं.०:२,
सेक्टर १३, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.सुषमा काशिनाथ मोरे
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सर्वे नं.२६, टेल्को चाळ, गणेश मंदिर बोपोडी जवळ,
रेंज हिल्स, पुणे शहर, पुणे-४११०२०
४) श्री.निलेश काशिनाथ पास्ते
वय : वर्षे, धंदा : नोकरी
रा.सिडको कॉलनी, बी-१०/६, रुम नं.३:३,
सेक्टर १३, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. गीता काशिनाथ पास्ते यांचे दि.०९/१०/२०१८ रोजी नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झालेले आहे. कै.गीता काशिनाथ पास्ते यांचे सामाईक मालकीची खालील वर्णनाची स्थावर मिळकत आहे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| मिळकत | क्षेत्र | किंमत |
|---|---|---|
| सिडको कॉलनी, बी-१०/६, रुम नं.३:२, सेक्टर १३, प्लॉट नं.२, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | २२.२० चौ.मीटर | रु.९०,०००/- |

सबब वरील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत, तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.गीता काशिनाथ पास्ते यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास अर्जदाराला वारसदाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.१३/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

राव साहेब
प्रो.जमा ६-२५

अर्जदाराचे वकील
ॲड.कु.दिपाली रा. गावंड
वकील उच्च न्यायालय

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१४०१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२४/११/२०२१

१) श्री.हिरामण नामदेव ठाकूर
वय : ६१ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.नारायण नामदेव ठाकूर
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.पंढरीनाथ नामदेव ठाकूर
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.सुहास नामदेव ठाकूर
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
५) सौ.हिराबाई मधुकर म्हात्रे
वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी
अ.क्र.१ ते ५ रा.शिवाजीनगर,
पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.मथुरा लालचंद पाटील
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोरावे, ता.पनवेल, जि.रायगड
७) सौ.कमळ एकनाथ म्हात्रे
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जासई, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी कै.धर्मीबाई उर्फ धर्मुबाई नामदेव ठाकूर ह्या दि.२६/०६/२०१९ रोजी मौजे : शिवाजीनगर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| न्हावे ३५६ | न्हावे | ए | ४९९ | ०-०६-०० |
| | न्हावे | ए | ७१० | १-०१-०८<br>०-०२-०४ |

कै.धर्मीबाई उर्फ धर्मुबाई नामदेव ठाकूर यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

अर्जदारातर्फे वकील : ॲड.योगेश म्हात्रे

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३१/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.२४/११/२०२१

१) श्रीमती.राजश्री सुधीर तांडेल
वय : ३३ वर्षे, धंदा : शेती
२) कुमार सार्थ सुधीर तांडेल
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.सुभाष मनोहर तांडेल
वय : वर्षे, धंदा : शेती
२) श्री.दौलत मनोहर तांडेल
वय : वर्षे, धंदा : शेती
३) श्रीमती.लक्ष्मीबाई मनोहर तांडेल
वय : ३३ वर्षे, धंदा : शेती
रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे सासरे व आजोबा तसेच सामनेवाला क्र.१ व २ यांना त्यांचे वडील व क्र.३ यांना त्यांचे पती मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल यांच्याकडून वारसाहक्काने आलेली मिळकत आहे. सदरची मिळकत ही मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल यांची मिळकत होती. कै.मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल हे दि.२०/०८/२००७ रोजी मु.जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तर कै.सुधीर मनोहर तांडेल हे दि.१०/०५/२०२० रोजी मयत झालेले आहेत. कै.मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल यांच्या नावे खालील मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळत आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | यु.के.नं. | अवॉर्ड नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० | २ | ०-०४-४ | | |
| २ | ११ | ६ | ०-१३-८ | २२६ | ५३ |
| ३ | २२० | ९० | ०-०१-८ | | |
| ४ | १८२ | ६ | ०-०६-८ | | |
| ५ | २६ | ३ | ०-०४-४ | | |
| ६ | ४१ | २ | ०-१०-८ | | |
| ७ | ४४ | ४ | ०-०५-० | | |
| ८ | ४७ | ४ | ०-०२-० | | |
| ९ | ५३ | ५ | ०-०४-४ | | |
| १० | ३९ | १ | ०-०५-८ | | |
| ११ | ६९ | ४ | ०-०९-८ | २२६ | २२६ |
| १२ | ११५ | ९ | ०-०६-४ | | |
| १३ | ११६ | ११ | ०-०४-८ | | |
| १४ | ११६ | १२ | ०-०३-४ | | |
| १५ | १४९ | ७ | ०-०४-४ | | |
| १६ | १५३ | १ | ०-१०-० | | |
| १७ | १६६ | ४ | ०-०७-१२ | | |
| १८ | १६७ | ३ | ०-०३-८ | | |
| १९ | १०६ | १२ | ०-०३-० | | |

कै.मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल यांचे मृत्यूपश्चात त्यांचा मयत मुलगा सुधी त्यांचया पश्चात अर्जदार सामनेवाला हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार व सामनेवाला यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही इसमाच्या हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

---

अर्जदारातर्फे वकील ॲड.विपुल रमाकांत ठाकूर

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१६४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२६/११/२०२१

१) कै.प्रकाश काशिनाथ भोईर (मयत तर्फे वारस)
१/१) श्रीमती.शकुंतला प्रकाश भोईर
वय : ७४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
१/२) श्री.प्रशांत प्रकाश भोईर
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : शेती
वरील रा.१ ते २ रुम नं.५०/८०५, गुलमोहर सोसायटी,
मगठाणे रोड, बोरीवली (इ.) मुंबई ४०००६६
१/३) श्रीमती.निलम मदन बंडा
उर्फ निलम प्रकाश भोईर
वय : ४० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
पत्ता : ठाकूर नगर, म्हातवली, उरण,
ता.उरण, जि.रायगड-४००७०२
२) श्री.विलास काशिनाथ भोईर
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
पत्ता : घर नं.९१२, कोटनाका, राघोबा मंदिर जवळ,
ता.उरण, जि.रायगड पिन-४००७०२
३) श्री.सुनील काशिनाथ भोईर
वय : ५९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
पत्ता : घर नं.२८९७, बालई, उरण,
ता.उरण, जि.रायगड, पिन-४००७०२
४) श्रीमती.रुक्मिणी शांताराम पाटील
उर्फ रुक्मिणी काशिनाथ भोईर
वय : ६६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
पत्ता : घर नं.पांजे, बोकडविरा, ता.उरण,
जि.रायगड, पिन नं.४००७०२ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. काशिनाथ भिकाजी भोईर यांचे निधन रा.मु.पो.काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै.प्रकाश काशिनाथ भोईर (मयत तर्फे वारस) श्रीमती.शकुंतला प्रकाश भोईर, श्री.प्रशांत प्रकाश भोईर, श्रीमती. निलम मदन बंडा उर्फ निलम प्रकाश भोईर, श्री.विलास काशिनाथ भोईर, श्री.सुनील काशिनाथ भोईर, श्रीमती.रुक्मिणी शांताराम पाटील उर्फ रुक्मिणी काशिनाथ भोईर कायदेशीर वारस आहेत. कै.काशिनाथ भिकाजी भोईर यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव/युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : काळाधोंडा ४७ | ५ | ३ | ०-०१-३ |
| २ | | ६ | २ | ०-२७-० |
| ३ | | ८ अ | २ | ०-०२-८ |
| ४ | | ११ | ३ | ०-१०-० |
| ५ | | ११ | ५ | ०-१२-७ |
| ६ | | ७९ | ३ | ०-०१-८ |
| ७ | | ७९ | ६ | ०-१४-८ |
| ८ | | ८१ | ३ | ०-०३-५ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार कै.प्रकाश काशिनाथ भोईर (मयत तर्फे वारस) श्रीमती.शकुंतला प्रकाश भोईर, श्री.प्रशांत प्रकाश भोईर, श्रीमती.निलम मदन बंडा उर्फ निलम प्रकाश भोईर, श्री.विलास काशिनाथ भोईर, श्री.सुनील काशिनाथ भोईर, श्रीमती.रुक्मिणी शांताराम पाटील उर्फ रुक्मिणी काशिनाथ भोईर हे कै.काशिनाथ भिकाजी भोईर यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांचया वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१३/१०/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

# संक्षिप्त...

## पारगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून यशस्वीपणे लसीकरण मोहिम राबविण्यात येत असल्याबद्दल होत आहे कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील पारगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांसाठी यशस्वीपणे लसीकरण मोहिम सातत्याने राबविण्यात येत असल्याबद्दल ग्रामपंचायतीच्या सरपंच अहिल्या बाळाराम नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून आजही त्यांनी मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहिम राबविली आहे.

लसीकरण पूर्ण करूया कुटुंब समाज सुरक्षित करूया मिशन कवच कुंडल अंतर्गत वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत लसीकरणाची मोहीम राबवले जात आहे. त्यानुसार लसीकरण पूर्ण करूया असे आव्हान ग्रुप ग्रामपंचायत पारगाव च्या वतीने सरपंच सौ अहिल्या बाळाराम नाईक यांनी आपले कुटुंब आणि आपला समाज सुरक्षित करूया असे आव्हान नागरिकांना आव्हान केले आहे. वैद्यकीय आरोग्य गव्हाण कोपर डॉक्टर अस्मिता पाटील विभागामार्फत मिशन कवच कुंडल अंतर्गत लसीकरण राबवले जात आहे. १००% नागरिकांना पहिला डोस चे लसीकरण पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत पारगाव हद्दीतील ज्या १८ वर्षावरील नागरिकांना पहिला डोस व ४५ वर्षावरील व्यक्तीना डोस देण्यात आले. कवचकुंडल अभियान कोल्ही आदिवासी वाडी येथे लसीकरण सत्र आयोजित करण्यात आले. ग्रुप ग्रामपंचायत पारगाव सरपंच सौ अहिल्या बाळाराम नाईक उपसरपंच सौ अंजली राहुल कांबळे मा उपसरपंच मनोज राम दळवे मा उपसरपंच सुशील कांत तारेकर ग्रामपंचायत सदस्य विजय वाघे मा सरपंच बेबी मारुती वाघे सदस्य सौ सुनंदा हरिभाऊ नाईक सदस्य सौ निशा रत्नदीप पाटील आरोग्य सेविका अलका वायर रे तसेच आरोग्य अधिकारी अधिकारी स्वप्नील पाटील तसेच अंगणवाडी सेविका सौ सरिता पाटील तसेच तंटामुक्ती अध्यक्ष सदाशिव पाटील व आशा वर्कर सौ वर्षा तारेकर आदी उपस्थित होते.





### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## शंभर टक्के लसीकरण होण्यासाठी आयुक्तांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेतील सर्व नागरिकांचे कोरोना लसीकरण शंभर टक्के पूर्ण होण्यासाठी पालिका प्रयत्न करत आहे. याच उद्देशाने आयुक्त गणेश देशमुख यांनी आज याकुब बेग माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, मायनॉरिटी गर्ल्स स्कूल, हुदा इंग्लीश मिडियम स्कूल, बानस् हायस्कूल या शाळेतील ३०० विद्यार्थ्यांशी ऑनलाईन संवाद साधला. यावेळी उपायुक्त सचिन पवार, वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकिय अधिकारी रेहाना मुजावर यांनीही या संवादामध्ये सहभाग घेऊन लसीकरणाचे महत्व मुलांना पटवून सांगितले. पालिका क्षेत्रात जवळजवळ ऐंशी टक्के नागरिकांचा पहिल्या डोसचे लसीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरीत २० टक्के नागरिकांचे पूर्ण करण्यासाठी मुलांनी आपल्या पालकांना लस घेण्यासाठी प्रवृत्त करावे यासाठी आयुक्तांनी आज याकुब बेग माध्यमिक व उच्च माध्यमिक, मायनॉरिटी गर्ल्स स्कूल, हुदा इंग्लीश मिडियम स्कूल, बानस् हायस्कूल शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाला मुलांनी उत्तम प्रतिसाद दिला. मुलांनी आपल्या मनातील तसेच आपल्या पालकांचे अनेक प्रश्न आयुक्तांना विचारले.



## स्वकष्टातून स्वावलंबी तरुण पत्रकाराने केली चक्क झेंडूची शेती

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

सध्याची सुशिक्षीत वाढती बेरोजगारी व जागतिक आर्थिक मंदीत अनेक तरुण नोकरी व्यवसायाच्या शोधात भरकटत आहेत. अशातच कोरोना वैश्विक महामारी निसर्ग संकटांची मालिका सुरु आहे.

अशा विपरित परिस्थितीतही पत्रकारितेत पदवीधर तसेच संगणकाचे अद्यायावत ज्ञान, न्युज चॅनलचे कार्यकारी संपादक पदी सेवा करुन पत्रकारितेत मास्टर्स होण्याचे उराशी स्वप्नं बाळगलेल्या माणगांव तालुक्यातील विकास कॉलनी येथील प्रतिक मोरे या सुशिक्षित बेरोजगार तरुणाने स्वकष्टातून स्वावलंबीपणे कमाई करण्याचे हेतुने माणगांव उमरोली येथे जवळपास २० गुंठे जमिन क्षेत्रात चक्क झेंडूची शेती केली आहे.



त्याने कलकत्ता झेंडूच्या ०२ हजार रोपांची लागवड करुन नैसर्गिक संकटाला न घाबरता जवळपास तिन महिन्याच्या कालावधीत केशरी-पिवळ्या झेंडूच्या फूलांची शेती बहरवली आहे. अधुन मधुन पडणारा पाऊस वादळवारा याचा सामना करत त्याने लावलेल्या कलकत्ता जातीचे झेंडूचे उत्पादन आता बाजारात विक्रीसाठी तयार झाले असुन ग्रामीण भागात शेती करून आज हा तरुण झेंडूची फुलं घरपोच विकत आहे. ही उत्तम दर्जाची फुले ४ ते ५ दिवस ताजी राहतात, फ्रिजमध्ये ठेवल्यास आणखी दहा पंधरा दिवस चांगली टिकतात. गणपती, दसरा, दिवाळी या सणावारात या फूलांना चांगली मागणी असते.

झेंडू शेती केली अन् वादळवारा गडगडाटासह पडलेल्या पावसात झेंडूची रोप पडली होती तरी पण न डगमगता सर्व पडलेल्या रोपांना आधार देत निगा राखत पून्हा ती उभी करुन जवळपास सहा ते सात वेळा योग्यती फवारणी केली कारण फूलांना रोगाचा प्रादूर्भाव होऊ नये त्यामुळे जरी उत्पादन खर्च वाढत असला तरी कठोर मेहनतीने रोजगाराची चांगली संधी मिळु शकते याचे उत्तम उदाहरण प्रतिकने दाखवुन दिले आहे.

त्याचेशी संपर्क करुन माहीती घेतली असता तालुक्यातील लोकांना आता शेतातून थेट घरपोच फूले विकण्याचा आपला मानस असल्याचे सांगत माणगांवकरांचे चांगले सहकार्य मिळेल यासाठीच आता सणावारांचे या दिवसात ताजी टवटवीत झेंडूची फूले या होतकरु तरुण शेतकऱ्यांकडून खरेदी करुन त्यांना प्रोत्साहीत करावे अशी आशा व्यक्त केली आहे. अनेकांनी बोध घ्यावा अशीचही झेंडूची शेती आहे.

## ॲड.शुभांगी केदार लाड नवदुर्गा पुरस्कार २०२१ ने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्षितीज पर्व स्नेहकुंज आधारगृह संगीत एकता सांस्कृतिक कला व सामाजिक संस्था जनाधर्मा आधारगृह व द्वारकादास श्यामकुमार यांच्या संयुक्त विद्यमाने सन्मान नवदुर्गा पुरस्कार २०२१ ने ॲड.शुभांगी केदार लाड यांना प्रशस्तीपत्र व पैठणी साडी देवून सन्मानित करण्यात आले आहे.

पनवेल परिसरातील अशा नवदुर्गांना या संस्थेच्या माध्यमातून



सन्मान कर्तृत्वाचा, सन्मान प्रेरणादायी व्यक्तीमत्वाचा, सन्मान अनमोल रत्नाचा, सन्मान तीच्या अस्तित्वाचा अशा प्रकाराने गौरविण्यात आले आहे.

त्यामध्ये स्नेहकुंज आधारगृहाच्या संचालिका संगीता नितीन जोशी, जनाधर्मा आधारगृह सहसचिव दिपाली पारसकर, क्षितीज पर्वचे संपादक सनीप कलोते यांनी ॲड.शुभांगी केदार लाड यांनी आतापर्यंत माता भगिनींना न्याय देण्याच्या माध्यमातून केलेले कार्य लक्षात घेवून त्यांचा विशेष सन्मान केला.

## शिवसेनेच्या बैठकीत पक्षांतर्गत वाद पेटले

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मंगळवारी झालेल्या शिवसेना श्रीवर्धन शहर संघटनेच्या बैठकीत शहर प्रमुख राजेश चव्हाण यांच्यावर उघड उघड नाराजी व्यक्त करत. पक्ष वाढीसाठी आपण काय काम केलात? आसा सवाल करत कामकाज जमत नसल्यास शहर प्रमुख पदाचा राजीनामा द्या अशी मागणी सर्वसाधारण शिवसैनिकांकडून करण्यात आली.

नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन शहरसंघटनेची शहरातील सर्व शाखा प्रमुख, विभाग प्रमुख, नगरसेवक व शिवसैनिक अशी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी नगरपालिका निवडणुकीत सामोरे जाण्यासाठी काय राजकीय खेळी कराव्यात यावर चर्चा करण्यात आली. यावेळी विद्यमान नगरसेविका पडवळ यांचे पती शिवसैनिक काका पडवळ यांनी पक्षाचे शहर प्रमुख यांच्यावर उघड नाराजी व्यक्त करत पक्षाच्या पदाचा राजीनामा देण्याची मागणी केली. निवडणुकीच्या तोंडावर बैठकीत झालेल्या पक्षांतर्गत वादाबाबत श्रीवर्धन नगरपालिका विरोधी पक्षनेत्या मीना वैश्विकर यांनी नाराजी व्यक्त करत. खऱ्या अर्थाने पक्ष वाढीसाठी व निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी तात्काळ शहरातील नेतृत्व बदलण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया दिली. नगरपालिका निवडणुकीत शिवसेनेला नेहमी पोषक वातावरण असत त्याप्रमाणे आता देखील आहे. नुकताच शिवसेनेच्या माजी नगरसेविका मुरकर यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झाला आहे. त्यामुळे शहरात क्रियाशील नेतृत्व उभं करणं पक्षहीतच्या दृष्टीने गरजेचं असून याची लवकरात लवकर वरिष्ठ स्थरावर विचार करावा अशी मागणी विरोधीपक्ष नेत्या मीना वैश्विकर यांनी केली आहे.

## टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोषने भारताकडून खेळताना ट्युनिशिया ओपनचे पटकाविले विजेतपद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी असलेली टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोषने भारताकडून खेळताना ट्युनिशिया ओपनचे विजेतपद पटकाविले आहे. स्वस्तिकाने १९ वर्षाखालील मुलींच्या एकेरी गटात ही 'सुवर्ण' कामगिरी साकारली. याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन व कौतुक केले. या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, स्वस्तिकाचे वडील व प्रशिक्षक संदीप घोष आदी उपस्थित होते.





दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


Mujawar So

Applicant Advocate : Shri.Rajiv Kumar Gupta

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) PANVEL AT PANVEL

Civil M.A. No.1439/2021
Exh : 8/D
Next Date : 23/12/2021

1) MRS.SYAMALA SASIDHARAN, Age : 64 Yrs, Occupation : House Wife
2) MR.PRASHOBH SASIDHARAN, Age : 40 Yrs, Occupation : Service
3) MRS.DEEPTI UMESH NAIR, Age : 42 Yrs, Occupation : Service
Residing at :- Bhoomiraj Woods, Bld. No.A-9, Flat No.602, 603,
Plot No.55, Sector 20, Kharghar, Panvel, Raigad-410210 Applicants

WHEREAS the above named Applicants have filed the application for Heir ship Certificate of deceased LATE.VAYYAT KIZHAKETHIL SASIDHARAN, Alias V.K.SASIDHARAN, who died on 26/04/2021, on Bhoomiraj woods, at Bld No.A-9, Flat No.602, Plot No.55, Sector-20, Kharghar, Panvel, Raigad-410210, India, in respect of her share in the properly mentioned herein under in schedule standing in the name of Deceased as co-sharer/holder with others which described as under :

**SCHEDULE OF PROPERTY**

| S. No. | Village / City | Flat No. | Floor No. | Building Name | Plot No. | Sector No. | Admeasuring Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | KHARGHAR-PANVEL | A-9/602 | 6 | BHOOMIRAJ WOODS | 55 | 20 | 42.92 Sq.Mts. Built-up Area (35.76 Sq.Mts. Carpet Area) + One Stilt Car Parking |
| 2 | KHARGHAR-PANVEL | A-9/603 | 6 | BHOOMIRAJ WOODS | 55 | 20 | 42.92 Sq.Mts. Built-up Area (35.76 Sq.Mts. Carpet Area) |

WHEREAS if any person has any Objections, Titles, Claims, Share etc. in the property herein under mentioned then they may appear in person or through their Advocats, objecting this application. If no one appears and objects for the same within 30 days from the date of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon.

Given under my hand and seal of this Court on this 13 October 2021.

Sd/-
Jr.Clerk
Civil Court, Panvel S.D.

Court Seal

Sd/-
Assit.Superintend
Civil Court, Panvel S.D.

## जिल्हा भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षपदी विद्या प्रकाश तामखडे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजप उत्तर रायगड जिल्हा भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षपदी कामोठे येथील विद्या तामखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदरचे नियुक्तीपत्र भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आज (दि. १३) प्रदान करण्यात आले.

यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, कामोठे मंडल अध्यक्ष रविंद्र जोशी, भटके विमुक्त आघाडी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबनराव बारगजे, भाजपा कळंबोली मंडल भविआ अध्यक्ष आबा घुटूकडे, पनवेल मंडळ भविआ अध्यक्ष गोपीनाथ मुंडे, व्यापारी आघाडी कामोठे अध्यक्ष नानासाहेब मगदूम, कामोठे व्यापारी आघाडी संयोजक कैलास सरगर, सहसंयोजक उत्तम जाधव आदी उपस्थित होते.

विद्याताई तामखडे यांना भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली असून भारतीय जनता पार्टीचा सामाजिक समरसतेचा संदेश उत्तर रायगड जिल्हयातील प्रत्येक नागरिकांपर्यंत विविध उपक्रम व कार्यक्रमांतर्गत पोहोचविण्याबरोबरच जिल्हयातील पक्ष संघटना अधिकाधिक मजबूत करणे आणि आगामी काळात विविध निवडणुकांमध्ये पक्षाला मोठे यश मिळवून देण्यासाठी जिल्हा भटके विमुक्त आघाडी काम करेल अशी अपेक्षा आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त करत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.




पंतप्रधान नरेंदजी मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नडडा, महाराष्ट्र प्रदेश भाजपा अध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विद्याताई तामखडे भाजपाचे ध्येय धोरण व कार्यक्रमाची यशस्वीरित्या अंमलबजावली करतील अशी, खात्री बबन बारगजे यांनी व्यक्त केली.

मा.पांडे सो.

ॲड.रुपेश राम म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

क्रि.एम.ए.१०७२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१५/११/२०२१

श्री.सुरज बाळकृष्ण भगत
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.मु.शेलघर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक
ग्रामपंचायत गव्हाण
पत्ता : मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ सामनेवाला

ज्याअर्थी कै.चांगुबाई बाबाजी भगत यांचा मृत्यू दि.२५/०६/१९८३ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : शेलघर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे, म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै.चांगुणाबाई बा.भगत यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.चांगुबाई बा.भगत ही वर नमूद ठिकाणी मयत झाली आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दखविल्या नाहीत तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१३/१०/२०२१ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

### जाहीर नोटीस

आमचे अशिलाचे वतीने तमाम जनतेस या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी श्रीमती.सोनाली करण भोईर व श्रीमती. कमल करण भोईर यांच्या मालकीचा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाबाधितांना पुर्नवसन व पुःर्नस्थापन योजनेंतर्गत त्यांना सिडकोच्या साडेबावीस टक्के योजनेनुसार पुष्पक वडघर नोड, येथील वाटप भूखंड संचिका क्रमांक KOL-ICOGS-176 N नुसार सिडको पुष्पक नोड, वडघर येथील सेक्टर R3, भूखंड क्रमांक 34 A, क्षेत्र ११० (चौ.मी.) हा वाटप करण्यात आलेला आहे. या भूखंडाचे सर्व हक्क व अधिकार व फायदे कायमस्वरुपी आमचे अशिल १) श्री.राम बाळाराम पाटील, २) श्री.प्रदीप तुकााम मुंडकर, ३) श्री.शिवदास अंबाजी ढमाले यांना हस्तांतरीत करण्याचे ठरविलेले आहे.

सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत भाडेपट्ट्याचे व इतर सर्व हक्क अधिकार हस्तांतरीत करणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खाालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा कार्यालयीन पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीमधील त्यांचा हिस्सा निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदार यांच्या बरोबर विक्री व हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १३/१०/२०२१

**सही/-**
**सौ.हर्षदा एस. गडकर**
**(ॲडव्होकेट हायकोर्ट)**
**ऑ.पत्ता : श्री. सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स, गाळा क्र.१२, प्लॉट नं.४२२, तक्का पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

## घरफोडीत ४५ हजाराची रोख रक्कम केली लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत ४५ हजार रुपयाची रोख रक्कम लंपास केल्याची घटना तालुक्यातील शिरढोण गाव येथील ग्रीन मेडोज सोसायटीमध्ये घडली आहे.

या ठिकाणी राहणाऱ्या शुभांगी कसबे यांचे घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी कोणत्या तरी कठोर वस्तूने त्यांच्या दरवाजाचे कुलूप तोडून त्यावाटे घरामध्ये प्रवेश करून घरामधील लाकडी कपाटामध्ये ठेवलेली ४५ हजार रुपये किंमतीची रोख रक्कम चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.